शनिवार, दि. ३ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



## लाडक्या बहिणींच्या अनुदानातील कपात थांबवा नसता तीव्र आंदोलन छेडणार - कैलास गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी -** ज्या लाडक्या बहिणींच्या बळावर सत्तेत आले.त्याच बहिणींच्या अनुदानात कपात करण्याचे पाप राज्यातील सत्ताधारी करत आहेत.जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार २१०० अनुदान तात्काळ द्यावे नसता लाडक्या बहिणींना सोबत घेऊन राज्य सरकार विरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

राज्यात काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा व शिंदे सेनेने सत्तेत आल्यानंतर राज्यातील महिलांना लाडक्या बहीण योजनेअंतर्गत प्रतीमहा २१०० रुपये अनुदान देण्याचे आश्वासन निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. या योजनेचा लाभ देण्यासाठी राज्यातील महीला भगिनिंकडून स्थानिक प्रशासनामार्फत अर्ज मागवून प्राप्त अर्जांची कोणतीही छाननी न करता तसेच योजनेचे कोणतेही निकष निश्चित न करता अर्ज करणाऱ्या सर्वच महीला भगिनींना पात्र ठरवत निवडणुकीपूर्वीच त्यांच्या बँक खात्यावर राज्य सरकारने अनुदानाची रक्कम वर्ग केली होती. यामुळे राज्यातील लाखो महीला मतदार भगिनींनी भाजपा व मित्र पक्षांच्या उमेदवारांच्या पारड्यात भरभरून मतदान टाकले. परिणामी राज्यात भाजपा व मित्र पक्षांचे सरकार सत्तारूढ झाले. मात्र, ज्या महिला भगिनिंच्या बळावर सत्ता काबीज केली त्या लाडक्या बहिणींना जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार प्रतिमहा २१०० रुपये अनुदान न देता सध्या देण्यात येत असलेल्या १५०० रुपयांच्या अनुदानात देखील कपात करण्याचे पाप राज्यातील सत्ताधारी करत असल्याची टीका माजी आमदार गोरंटयाल यांनी केली आहे. विविध योजने अंतर्गत देण्यात येत असलेल्या अनुदानाचा लाभ घेत असल्याचे कारण पुढे करून राज्य सरकार भरभरून मतदान करणाऱ्या महिला भगिनींवर मोठा अन्याय करत असल्याचा आरोप गोरंटयाल यांनी केला आहे. निवडणुकीत केवळ मतदानासाठी वापर करून आता त्याच महीला भगीनिंच्या अनुदानात कपात करण्याचा उद्योग राज्य सरकारने तात्काळ थांबवावा आणि निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार लाडकी बहिण योजनेसाठी पात्र ठरलेल्या सर्वच म हीला भगिनींना प्रतीमहिना २१०० अनुदान द्यावे अशी मागणी करत राज्य सरकारने त्यासाठी आवश्यक पाऊल उचलले नाही तर अन्याय झालेल्या लाडक्या बहिणींना सोबत घेऊन राज्य सरकार विरुद्ध आगामी काळात काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

### शेतकऱ्यांना कर्जमाफी, मोफत वीज केव्हा देणार ?

विधानसभा निवडणुकीत अनेक खोटी आश्वासने देऊन सता काबीज करणाऱ्या भाजपा मित्र पक्षांच्या नेत्यांना आता आश्वासनांचा विसर पडला की काय ? असा सवाल उपस्थित करून माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि मोफत वीज केव्हा देणार असा प्रश्न राज्य सरकारला विचारला आहे. लाडक्या बहिणींना थापा मारणारे हे सरकार निवडणूक जाहीरनाम्यात आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना देखील कर्जमाफी आणि मोफत वीज देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत लाडकी बहिण,शेतकऱ्यांसह सामान्य जनतेच्या हितासाठी लवकरच व्यापक आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

युवा आदर्श

**पी ए ...**

पीए अन् ओ एस डी
तावूनसुलाखून नेमा
आंत सभ्य कार्यकर्ते
वरुनि परिधान निमा
महत्व मोठे विश्वासा
नको भ्रामक मुलामा
जी हुजूरी करणाऱ्या
टाळ लाळाळू गुलामा
मध्यस्थ करे अस्वस्थ
वेळीचं जाणा अधमा
सावरणेअशक्य करी
भूकंप धक्का सदमा
हातात अनिर्बंधसत्ता
कशाला करावी तमा
कर्तव्य करी शून्यवत
अधम बनवेलं उत्तमा
बाहेर पडतात लफडे
चिकटे कुणा वहिमा
बदनाम संपूर्ण वस्ती
दुजांचा असो महिमा
मध्यस्थाच्या कामांचा
कोण काढणारं विमा
मिडीया बातमी नाचे
खेळती फुगडी झिम्मा
सुटूनजाई नोकरशहा
आपला बनवून मामा
चक्रात सापडतो नेता
जनता ना करेलं क्षमा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## आता फक्त माणसं सुधारण्याची गरज - दानवे

### विल्हाडीच्या बालकविता संग्रहाचे थाटात प्रकाशन

**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार शेतीवर मोठ्या प्रमाणात खर्च करत असून तालुका , जिल्हा ,राज्य आणि देश सुधारले, आता फक्त माणसं सुधारण्याची गरज आहे, असे मत म ाजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केले.

आशयघन प्रकाशनाचे शालेय विद्यार्थ्यांच्या रचित कवितांचे विनोदकुमार पांडे संपादित विल्हाडीच्या बालकविता संग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र दिनी गुरुवारी ( ता. ०१)

जिल्हा परिषद शाळेच्या सभागृहात रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भावकवयित्री डॉ.संजीवनी तडेगांवकर ,आशयघन प्रकाशनाचे पंडितराव तडेगांवकर,रोटरी क्लब ऑफ जालनाचे रो. दीपक बगडिया,सचिव रो. रवी भक्कड,सरपंच ममता इनामे, शालेय समिती अध्यक्ष भगवान कान्हेरे, संजय खरात, मुख्याध्यापक विष्णू सोनटक्के, ज्ञानेश्वर इनामे,विनोद कुमार पांडे ,ग्रा.पं.व शालेय समितीचे पदाधिकारी यांची प्रम ुख उपस्थिती होती.

रावसाहेब पाटील दानवे यावेळी म्हणाले, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीचे वाढलेले प्रमाण हे चिंताजनक असून बालवयातच शिक्षणाप्रती गोडी निर्माण करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य वळण देण्याचे काम गुरुजींनी करावे असे आवाहन त्यांनी केले. प्रकाशित पुस्तकाचे मुखपृष्ठ ,शीर्षक, सुलेखन, रेखाटने येथील विद्यार्थ्यांचे असल्याबद्दल दानवे यांनी समाधान व्यक्त केले.

डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी ग्रंथावर भाष्य करताना धडपडणारे, व्यासंग असणारे शिक्षक विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची योग्य किंमत करतात, असे सांगून काव्यसंग्रहात विद्यार्थ्यांमधील



प्रतिभा आणि शब्दांची ताकद उमटली आहे असे त्यांनी सांगितले.

पंडितराव तडेगांवकर यांनी कविता प्रकार हा अवघड असला तरी भावना व्यक्त करण्यासाठी सोपा आहे. विद्यार्थ्यांनी आपलं पान ३ वर

## परतूरच्या दृष्टी लायन्स नेत्रालयात दोन डायलिसिस मशीन कार्यान्वित

### कॅन्सर बाह्यरुग्ण तपासणी कक्ष, स्वर्गरथ व रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक व्हावी, या उद्देशाने दृष्टी लायन्स नेत्रालय, परतूर येथे डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. १ मे या म हाराष्ट्र दिनापासून दोन डायलिसिस मशीन कार्यान्वित करण्यात आल्या असून, या सुविधेचा लाभ गरजू रुग्णांना अत्यल्प दरात मिळणार आहे. याप्रसंगी स्वर्गरथ व रुग्णवाहिका या आरोग्य सुविधांचे लोकार्पण आणि कॅन्सर बाह्यरुग्ण तपासणी कक्षाचा शुभारंभ ड. अर्चना नितिन तोतला यांच्याहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल गिरीश सीसोदीया, सीए नितीन तोतला, डॉ. बागड, विजय बगडिया, पान ३ वर



## ३६ तासात युद्धाला सुरुवात - भगरे गुरुजी

**सोलापूर -** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अशातच भारत आणि पाकिस्तानात युद्धाचे ढग आले आहेत. येत्या ३६ तासात युद्धाला सुरुवात होणार असल्याची माहिती अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांनी दिली आहे.

भारताची रास मकर असून भारताचे ग्रहमान अनुकूल आहे. देशाची साडेसाती २९ मार्च रोजी संपली आहे. शनी तिसऱ्या स्थानी असल्याने मे पान ३ वर

## लाडकी बहिण; पुढील दोन दिवसात एप्रिलचा हफ्ता जमा होणार

**मुंबई -** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता अद्याप लाडक्या बहिणींना मिळालेला नाही. त्यामुळे एप्रिल महिन्याचा हप्ता कधी मिळणार? याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागलेलं असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात महत्वाची माहिती सांगितली आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केली. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. तसेच महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० ऐवजी दरमहा २१०० रुपये देण्याचंही आश्वासन दिलं होतं. मात्र, अद्याप लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याच्या निर्णयावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

दरम्यान, एप्रिल संपला तरीही अद्याप एप्रिल महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना मिळाला नव्हता. त्यामुळे लाडक्या बहिणींकडून याबाबत प्रश्न विचारले जात होते. असं असतानाच आता महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एप्रिल महिन्याचा हप्ता कधी पान ३ वर

## तहानलेल्या गावांसाठी घाटगेंचा एल्गार

### गोदावरी नदीवरील कॅनॉल दरवाजे उघडून शेतकऱ्यांसाठी सोडले पाणी

**अंबड । प्रतिनिधी -** जायकवाडीच्या पाण्यावरून पेटलेल्या असंतोषाचा ज्वालामुखी शुक्रवारी उसळला! समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांनी तहानलेल्या गावांसाठी आक्रमक भूमिका घेत थेट गोदावरी नदीच्या कॅनॉलचे दरवाजे उघडले. शेकडो शेतकऱ्यांच्या साथीनं घाटगे पाटलांनी गुळज आणि तळनेवाडी येथील कॅनॉलचे अडथळे झुगारून लावले आणि हक्काचं पाणी गोदावरीच्या पात्रात सोडलं.

अंबड-घनसावंगी तालुक्यात भीषण पाणीटंचाई असताना, पिण्याच्या पाण्यासाठी आणि मुक्या जनावरांसाठी त्राहिमाम असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी मात्र डोळेझाक करत होते. जायकवाडी धरणात पुरेसा साठा असूनही गोदाकाठच्या गावांना कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात चालढकल केली जात होती. या प्रशासकीय उदासिनतेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता.

अखेरीस, सतीश घाटगे पाटील यांनी या असंतोषाचं नेतृत्व करत थेट मैदानात उतरण्याचा निर्धार केला. शुक्रवारी, त्यांनी शेकडो शेतकऱ्यांना एकत्र करत गोदावरी नदीच्या उजव्या कालव्यावरील गुळज आणि तळनेवाडी कॅनॉलकडे कूच केली. संतप्त शेतकऱ्यांच्या रेट्यापुढे पाटबंधारे विभागाच्या पान ३ वर

> घनसावंगी -अंबड तालुक्यातील दुष्काळी गावांची परिस्थिती लक्षात घेऊन पाट बंधारे विभागाने लवकरच हे पाणी सोडायला पाहिजे होत. परंतु पाट बंधारे विभागाच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना वेठीस धरण्यात येत आहे. आम्ही सरकारला बदनाम होऊ देणार नाही. त्यामुळे शेतकरी हितासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसात मंगरूळ , शिवनगाव, जोग्लादेवी बंधाऱ्यात एस्केप गेट उघडून पिण्यासाठी पाणी न सोडल्यास तिथले एस्केप गेट उघडून आम्ही पाणी खुले करणार आहोत.
>
> **- सतीश घाटगे,**
> **भाजपा नेते तथा चेअरमन समृद्धी शुगर्स**



# संपादकीय पान

## स्वप्नातील महाराष्ट्र

मंगल देशा, पवित्र देशा,
महाराष्ट्र देशा...
राकट देशा, कणखर देशा, दगडांचा देशा....

असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या महाराष्ट्रात माझा जन्म झाला, त्या महाराष्ट्रात मी लहानाचा मोठा झालो, वाढलो याचा मला सार्थ अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने आणि साधू संतांच्या वाणीने पावन झालेली ही पवित्र महाराष्ट्र भूमी. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, संत गाडगेबाबा यासारखे महापुरुषही मराठी मातीनेच भारताला दिले. सात बेटांचे शहर म्हणून ओळखली जाणारी व देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही याच महाराष्ट्राची राजधानी आहे. देशाला सर्वात जास्त महसूल हा मुंबईतूनच मिळतो, पण याच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव दिल्लीश्वरांनी घातला, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी १०६ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. याच १०६ हुतात्म्यांमुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राची निर्मिती होऊन आज ६५ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ६५ वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, शेती, जलसिंचन, विज्ञान, तंत्रदान, उद्योग, व्यापार अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. जगाला हेवा वाटावा असा निसर्ग महाराष्ट्राला लाभला आहे. एककिडे उंचच सह्याद्रीच्या रांगा तर दुसरीकडे ७२० किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. असे असले तरी आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. महाराष्ट्रातच आज मराठी भाषेची गळचेपी होऊ लागली आहे. परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे मुंबई सारख्या शहरातून मराठी माणूस हद्दपार होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. अमृतातही पैज जिंकणारी असे जीचे वर्णन केले जाते, त्या मराठी भाषेची महाराष्ट्रातच उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा बोलायला तरुणांना लाज वाटते. आज मराठी तरुण मराठी भाषा बोलण्याऐवजी हिंदी व इंग्रजी बोलण्याला प्राधान्य देत आहे. हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा महाराष्ट्रातच मागे पडू लागली आहे. पालकही आपल्या पाल्यांना मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करू लागले आहेत. विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. सर्वसामान्य नागरिकांपासून, साहित्यिक तसेच राज्यातील अनेक नेत्यांनी ही मागणी करूनही शासन दरबारी त्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. आज राज्यातील ४० टक्के जनता ही तरुण आहे. पण, या तरुणांच्या हाती रोजगार नाही. राज्यात बेरोजगारीने कळस गाठला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही हाती काम नसल्याने तरुणांना नैराश्य आले आहे. जर या तरुणांना नैराश्यातून बाहेर काढायचे असेल तर सरकारने रोजगार वाढीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. जर या तरुणांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतला तर महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित असेल पण बेरोजगार नसेल. तरुणांप्रमाणेच शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे अनेक प्रश्न आहेत. तरुणांप्रमाणे शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे प्रश्न सुटले तर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी, कष्टकरी वर्गाचे राज्य येईल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र उद्योग व्यवसायात अग्रेसर असेल. शेतीसहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास झालेला असेल तो ही पर्यावरणाचा ऱ्हास न होता. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात पी जी ते के जी शिक्षण मोफत असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात सर्वांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा उपलब्ध असेल. पैसे नाहीत म्हणून कुणाचाही जीव जाणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात भ्रष्टाचाराला थारा नसेल. शिवशाहित ज्याप्रमाणे माताभगिनी सुरक्षित होत्या, तशाच माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातही माताभगिनी सुरक्षित असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात जात-पात, धर्म -वंश याला थारा नसेल. भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्राची कीर्ती केवळ भारतातच नाही तर जगात पसरेल. संपूर्ण जगाला हेवा वाटेल असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# एकीकडे उष्णतेची लाट; तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!

बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे.कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही.आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे,ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते.त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो.आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही. कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे,औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे. वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले.शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे.१ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ ?अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे.सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सदगुरु श्री शंकर महाराज

**मै कैलास का रहनेवाला , मेरा नाम है शंकर ।**
**दुनिया को समझाने आया, करले कुछ अपना घर ।।**
**यहां दुनिया मे कोई रंग है, यह रंग निराला है ।**
**पाया न भेद किसने, यह गहरा ही गहरा है ।।**

हे शंकर महाराजांचे शब्द आहेत.

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांना शंकर महाराज गुरुस्थानी मानत. ते भक्तांना स्वामींचा जप करावयास लावत. सोलापूर येथील शुभराय मठात, त्र्यंबकेश्वर येथील रामभाऊ उर्फ रामचंद्र अकोलकर यांचे घर, अहमदनगर येथील डॉक्टर धनेश्वर, बालगंधर्व, प्र.के. अत्रे, असे अनेक प्रसिद्ध व्यक्ती शंकर महाराजांचे भक्त होते. त्या भक्त परिवारातील अनेकांनी शंकर महाराज यांच्या बद्दल आपल्या आठवणी लिहून ठेवलेल्या आहेत. वैशाख शुद्ध अष्टमी २४ एप्रिल १९४७ रोजी पुणे येथील धनकवडी पद्मावती येथे समाधी घेतली.

५ मे २०२५ सोमवार रोजी वैशाख शुद्ध अष्टमी आहे.

सदगुरु श्री शंकर महाराज यांचा ७८ वा समाधी सोहळा सातारा रोड, धनकवडी, पुणे येथील मठात २८ एप्रिल ते

५ मे २०२५ या काळात संपन्न होणार आहे. निमित्ताने संगीत महोत्सव, भजन- कीर्तन, प्रवचन, ध्यान शिबिर, तसेच रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर असे धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

सद्गुरु शंकर महाराज यांच्या शंकर गीता व शंकर बावनी या दोन पुस्तकात महाराजांचे लीला वर्णन आले आहे. त्यातूनच आपल्याला शंकर महाराजांन विषयी बरीच माहिती मिळते. तसेच शंकर महाराजांच्या जीवनावर आधारित साद देती हिमशिखरे व 'अंतरीचा मागोवा' या जी.के.प्रधान.लिखित दोन अध्यात्मिक पुस्तकातून बरीच माहिती मिळते. समाधी मंदिरातही ग्रंथ मिळतात.



थश्री शंकर महाराज अगदी अलीकडच्या काळात होऊन गेलेले सत्पुरुष. त्यांची समाधी मठ पुणे येथे सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. त्यांच्या समाधीचा दिनांक वैशाख शुद्ध अष्टमी शके १८६९.

थसमाधीची अधिकृत नोंद आहे. पण बालपण, माता-पिता, शिक्षण, गुरू, साधना, शिष्य-संप्रदाय इत्यादींचा तपशील हवा तसा मिळत नाही.

शंकर महाराजांनी एकदा म्हटले होते, 'मै कैलास का रहनेवाला हूँ, मेरा नाम है शंकर'! ते खरोखरच शंकराचे अवतार असावेत. नाशिक जिल्ह्यात अंतापूर नावाचे गाव आहे. तिथे चिमणाजी नावाचे गृहस्थ राहात होते. त्यांना मूल-बाळ नव्हते. ते शिवाचे भक्त होते. एकदा त्यांना स्वप्नात दृष्टान्त झाला. 'रानात जा. तुला मुल मिळेल. घेऊन ये.' ते त्या दृष्टान्ताप्रमाणे रानात गेले. तिथे त्यांना हा दोन वर्षांचे मुल मिळाले. शंकराचा प्रसाद म्हणून त्याचे नाव 'शंकर' ठेवले. 'शंकर' या माता-पित्याजवळ काही वर्षे राहिला. नंतर या बाळाने माता-पित्यांनाच आशीर्वाद दिला, 'तुम्हाला पुत्रप्राप्ती होईल!' आशीर्वाद देऊन शंकर बाहेर पडला. नाव नाही, रूप नाही, एक स्थान नाही. श्री शंकर महाराजांना नेमके एक नाव नाही. ते अनेक नावांनी वावरत. 'शंकर' या नावाप्रमाणेच 'सुपड्या', 'कुंवरस्वामी', 'गौरीशंकर' अशा नावानीही ते ओळखले जात. ही नावे कळली एवढेच! आणखीही काही नावांनी ते वावरत असावेत. 'नाव' जसे एक नाही, तसेच त्यांचे 'रूप'ही. काही ठिकाणी त्यांचा उल्लेख 'अष्टावक्र' असाही केलेला आढळतो. त्यांचे डोळे मोठे होते, ते अजानुबाहू होते, त्यांची गुडघे वर करुन बसण्याची पद्धती होती. ते वेगळ्या अर्थाने 'बहुरूपी होते.

ते कधी एका स्थानीही राहात नसत. त्रिवेणी संगम, सोलापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर, नाशिक, नगर, पुणे, हैद्राबाद, तुळजापूर, औदुंबर, श्रीशैल- अशा स्थानी त्यांची भटकंती असायची. सांगितली एवढीच स्थाने असतील असेही नाही. म्हणजे शंकर महाराजांचे 'नाम-रूप-स्थान' सांगणे कठीण आहे. कारण खऱ्या अर्थाने ते वैराग्यसंपन्न होते. म्हणूनच 'शंकर' होते.

सदगुरु शंकर महाराज यांचे मंदिर काशी मध्ये आहे. तिथे बाबांना खिचडी बाबा म्हणतात. श्री शंकर महाराज योगीराज होते, याचा अनेकांनी अनेक प्रकारे प्रत्यय घेतला आहे. ते स्वतः मात्र नेहमी म्हणत, 'सिद्धीच्या मागे लागू नका.' पण त्यांनी आपले योगसामर्थ्य कळत-नकळत अनेकांच्या प्रत्ययाला आणून दिले. काहींना 'सिद्धी' हवी असते ती 'प्रसिद्धी'साठी, त्याने नावलौकिक वाढतो, धन-दौलत मिळते, शिष्य-परिवार वाढतो, म्हणून श्री शंकर महाराज म्हणत 'सिद्धीच्या मागे लागू नये' त्यांना स्वतःला सिद्धी प्राप्त होत्या पण त्यांनी धन-दौलत, नावलौकिक वा शिष्य-परिवारादि उपाधी मागे लावून घेतल्या नाहीत.

ते स्वतः खऱ्या अर्थाने सिद्धींच्या मागे लागले नाहीत. पण शंकर महाराज अलौकिक पुरुष होत, हे चिकित्सक विद्वानांनाही मान्य होते. आचार्य अत्रे, न्यायरत्न विनोद यांच्यासारखे प्रकांड पंडित शंकर महाराजांना मानीत. हे विद्वान त्यांची योग्यता जाणून होते.

महाराज म्हणत, 'मला जाती, धर्म काही नाही. ते स्वतः खरोखरीच सर्वांशी समभावाने वागत. त्यामुळे त्यांच्याकडे मुसलमानही येत. एका मुसलमानाने त्यांना आपली काही अडचण सांगितली. शंकर महाराजांनी त्यांना काय सांगावे? 'अरे, तू नमाज पढत नाहीस. नमाज पढत जा. तुझी अडचण दूर होईल.' ते काय शिकले होते कुणास ठाऊक! पण काही दीड शहाण्या विद्वानांना त्यांनी अस्खलित इंग्रजीतून उत्तरे दिली. त्यांना इंग्रजीचे ज्ञान कसे नि कुठे झाले, कुणास ठाऊक.अनेक गोष्टी अनाकलनीय होते.

थपुण्यात आप्पा बळवंत चौक प्रसिद्ध आहे. आप्पा बळवंत मेहेंदळे यांचा वाडा चौकातच आहे.. बळवंतराव मेहेंदळे हे पानिपतच्या लढाईत लढले होते. त्यावेळी 'अप्पा बळवंत' हा केवळ बारा वर्षांचा होता. सरदार मेहेंदळे यांचा वाडा होता म्हणून त्या चौकाचे नाव 'आप्पा बळवंत चौक. मेहेंदळे यांच्या घराण्यातील 'ताईसाहेब मेहेंदळे' शंकर महाराजांमुळे प्रसिद्धीस आल्या.

एक दिवस शंकर महाराजांनी ताईसाहेब मेहेंदळे यांच्या गळ्याला बोटाने स्पर्श केला नि सांगितले, 'ज्ञानेश्वरी सांग.' ताईसाहेब ज्ञानेश्वरीवर प्रवचने करू लागल्या.'

ताईसाहेब मेहेंदळे आपल्या वाड्यातच प्रवचने करीत. मेहेंदळे वाड्यात वरती माडीवर मोठा दिवाणखाना होता. तिथे ही प्रवचने चालत. तो मोठा दिवाणखाना श्रोत्यांनी भरून जात असे. त्यांच्या मुखातून साक्षात सरस्वती अवतरायची. त्या वेदोपनिषदांची, आचार्यांची अवतरणे देण्याच्या भानगडीत सहसा पडत नसत. पण वेदांत, योगशास्त्र अशा काही अभूतपूर्व रीतीने सांगत की, प्रगाढ पंडितांनी माना डोलवाव्या. त्या ज्ञानेश्वरी सांगत, पण ज्ञानेश्वरीची काव्यमयता, शास्त्रीयता, वैचारिक सुसंगती नि झेप त्यांच्या प्रवचनांतून अनायासे प्रकट होई. विशेष असे की, त्यांचे पतीही त्यांची ज्ञानेश्वरी ऐकायला बसत. ताईसाहेब मेहेंदळ्यांची प्रवचने ऐकायला काही वेळा शंकर महाराजही येत. मेहेंदळे पती-पत्नीची त्यांच्यावर प्रगाढ श्रद्धा होती.

थश्री शंकर महाराजांनी मोठमोठी व्याख्याने, प्रवचने केली नाहीत. एखाद्या ग्रंथावर टीका लिहिली नाही. आलेल्या व्यक्तींना त्यांचे साधेसुधे मार्गदर्शन असे-

महाराज म्हणतात,आचरण महत्त्वाचे, ग्रंथांचे वाचन नि अभ्यास आचरणात येईल तेवढाच खरा.ते म्हणत, 'भावनेने भिजलेले असेल, ते भजन'. त्यांनी अनेकांना सांगितले, 'माता-पित्याची सेवा करा. कुलदेवतेची आराधना करा. यापेक्षा अधिक काही नको.'

श्री सदगुरु शंकर महाराज हे उंचीने फार कमी आणि जन्मतः अष्टावक्र व आजानुबाहू होते. त्यांचा उत्साह हा वाखाणण्यासारखा असे. नेहेमी सफेद धोती आणि सफेद शर्ट परिधान करून असत. खूप वाढलेले केस, दाढी मिशी आणि त्यातून डोकांवणारे अतिशय मोठे पण भेदक डोळे. प्रथमदर्शनी महाराजांचे वागणे एखादया लहान मुलाप्रमाणे वाटे. पण त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज आणि योग सामर्थ्य लपत नव्हते. लहान मुलांप्रमाणे वागणारे आणि स्वतःला अज्ञानी आणि गांवढळ म्हणणारे महाराज जेव्हा बोलत तेव्हा मात्र भल्याभल्यांची तोंड बंद होत असत. स्वतःला अशिक्षित म्हणवणारे महाराजांचे जवळजवळ सर्वच भाषांवर प्रभुत्व होते. आलेल्या भक्ताच्या मायबोलीत ते त्याला उत्तर देत. त्यांचे हे प्रभुत्व फक्त भारतीय भाषेवरच नाही तर परदेशी भाषांवरपण होते, आलेल्या रशियन दांपत्याशी महाराजांनी अस्खलीत रशियन भाषेत संवाद साधला होता. हे न सुटलेले कोडे आहे. भगवंतच तो त्याला काय अशक्य! अक्कलकोट स्वामी समर्थांना शंकर महाराज आपले गुरु असे संबोधीत.

ॡ आपल्या लहानपणी शंकर महाराज फार खोडकर आणि खट्याळ होते. एक दिवस एका हरिणाच्या पिल्लाचा पाठलाग करत करत ते एका अरण्यात पोहोचले. त्या घोर अरण्यात त्यांना एक शंकराचे जीर्ण देऊळ दिसले. ते हरणाचे पिल्लू सुद्धा त्या देवळात आश्रयाला लपले.त्या पिल्लाला बाण मारणार एवढयात शंकर महाराजांसमोर एक दिगंबर साधू आला. त्याने त्या हरणाच्या पिल्लाला उचलून आपल्या कुशीत घेतले. आणि महाराजांना म्हणाला कशाला मारतोस रे ह्याला, काय बिघडवले ह्याने तुझे. काही वेळाने त्या दिगंबर साधूने महाराजांच्या मस्तकावर हात ठेवला. ही त्यांची प्रथम स्पर्शदिक्षा. महाराज त्या स्पर्शाने अगदी भारावून गेले. तो दिगंबर साधू म्हणजे अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज असे म्हणतात.

ॡ पुण्याच्या डेक्कन कॉलेज मध्ये असणाऱ्या प्रोफेसर भालचंद्र देवांना महाराजाच्या वया विषयी कुतूहल होते. एक दिवस धीर करून त्यांनी महाराजांना प्रश्न विचारलाच महाराज! आपले वय काय असेल हो?

महाराज उत्तरले अंदाजे १५० वर्षे. मी शनिवारवाडयात पेशव्यांबरोबर पंगतीला बसलो आहे ही घटना साधारण १९३५ ची आहे म्हणजे महारांजानी जेव्हा महासमाधी (१९४७) घेतली त्या वेळेस ते १६२ वर्षांचे होते.

पुण्याच्या डॉक्टर धनेश्वर ह्यांना असेच महाराजांच्या वयाबद्दल संदेह होता. त्यांनी महाराजांची परवानगी घेऊन त्यांच्या काही मेडिकल टेस्ट करून घेतल्या. त्या टेस्टचा रिझल्ट आल्यावर डॉक्टराना भोवळ आली. रिझल्ट मध्ये महाराजांचे वय १५२ वर्षे आले.

ॡ शंकर महाराजांचा आवडता नंबर होता १३. कारण विचारले असता ते म्हणत सबकुछ तेरा, कुछ नाही मेरा महाराज वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावानी प्रसिद्ध आहेत.

सातपुड्यात सुपड्या बाबा, खानदेशात कुवर स्वामी, वाघोद मध्ये गौरीशंकर, मध्यप्रदेशात लाहिरी बाबा. एवढेच काय पण परदेशात पण ते प्रसिद्ध आहेत. जपानमध्ये महाराजांचे असंख्य भक्त आहेत.संजीवनी मेडिकल कंपनीचे मालक परांजपे ह्यांच्याकडे शंकर महाराजांचे एक छायाचित्र आहे. जे एका जपानी चित्रकाराने काढले आहे.

प्रापंचिकांना त्यांचा परखड उपदेश असे. 'प्रपंचातील अडीअडचणी तुमच्या तुम्हीच सोडविल्या पाहिजेत. त्याच्यासाठी कोणाकडे जाणे योग्य नाही.

शंकर महाराज समाधी ट्रस्ट च्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम ही राबविले जातात. मंदिरात आरती नंतर रोज प्रसाद वाटप होते.. अनेक भक्त ही प्रसाद वाटप करतात.. आम्ही बरेचदा पुणे मुक्कामात समाधी दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला आहे.. खुपच प्रसन्न वातावरण असते... खुप वेळ थांबावेसे वाटते.



महाराजांचा कल्याणकारी मंत्र....

।। ओम नमो सदगुरु श्री शंकरमहाराजाय, महाविपत्ती निवारणाय, भक्तजन मनकामना कल्पद्रुमाय, दृष्टजन मनकामना स्तंभनाय, महाविपत्ती निवारणाय, श्री स्वामी समर्थ प्रिया वल्लभाय, प्राणप्रियाय स्वाहा, श्री शंकर महाराज नमो नमः । जय शंकर ।

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव., मो. ८९९९५६६९१७**

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना । प्रतिनिधी** - राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे शनिवार दि.३ मे, २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शनिवार दि. २ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता राजमिलन मिठाई भंडार, सदर बाजार, बडी सडक, जालना येथे आगमन होणार आहे. तसेच सकाळी ९.४५ वाजता राजमिलन मिठाई भंडार, सदर बाजार, बडी सडक, जालना येथे कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सकाळी १०.१५ वाजता जेईएस कॉलेज येथे आगमन सकळी १०.३० वाजता जेईएस कॉलेज येथे जनजागृती मंडळ, जालनाद्वारे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहतील. तसेच सकाळी ११.३० वाजता इन्सिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, फेज-२ एमआयडीसी, जालना येथे आगमन सकाळी ११.५० वाजता इन्सिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, फेज-२ एमआयडीसी, जालना येथे राखीव. दुपारी १.०५ वाजता कालिका स्टील फेज २ येथे आगमन दुपारी १.१५ वाजता कालिका स्टील फेज २ एमआयडीसी येथे राखीव दुपारी २.०० वाजता शुभदायोग प्लॉट नं. १६ एन ४ सिडको, हॉटेल पालकी शेजारी छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.



## विवेकानंद इंग्लिश स्कूलचे १६ विद्यार्थी स्कॉलरशिपधारक गुणवत्ता व मेहनतीचं उत्तम फळ



**परतूर । प्रतिनिधी -** येथील विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) परीक्षेत घवघवित यश मिळवले असून एकूण १६ विद्यार्थी स्कॉलरशिपसाठी पात्र ठरले आहेत. या यशामुळे संपूर्ण शाळेचा नावलौकिक आणखी उंचावला आहे.

शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.बाहेकर, प्राचार्य व शिक्षकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून पालकवर्गातही आनंदाचे वातावरण आहे.इयत्ता ५ वी तील विद्यार्थी, अनन्या, अर्णव सोनखेडकर. सियाल भंडारी. शेख अझिन झुबिया. व इयत्ता ८ वी तील विद्यार्थी, ज्ञानदा भोसले, रिधिमा पोरवाल, आराध्या वायाळ.अपूर्वा चिंचाणे.

अणुश्री तापडिया, अदिती खोखले, राहिन शेख, संस्कार कनंदारे, कृष्णा राठोड, प्रणव माने, अर्पित कासार, विक्रम सोळंके या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे व शाळेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विवेकानंद इंग्लिश स्कूलने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.गुणवत्ता आणि मेहनत यांचे संयोग यशाच्या सर्वोच्च शिखरावर घेऊन जातात.यासाठी संस्था अध्यक्ष आणि शिक्षक सातत्याने परिश्रम घेत असतात.

# अरुण जाधव यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार प्रदान

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील आनंदवाडी येथे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असणारे अरुण कारभारी जाधव यांना दि.०१/०५/२०२५, में रोजी गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार देण्यात आला. कामगार दिनानिमित्त संभाजीनगर विभागाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते अरुण जाधव याना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. कामगार दिनानिमित्त महावितरणच्या वतीने विभागीय गौरव सोहळा घेण्यात आला होता. याप्रसंगी तंत्रज्ञ अरुण कारभारी जाधव यांनी आनंदवाडी व परतूर शहरात महावितरण मध्ये महावितरणच्या परिमंडळात काम करीत असताना वर्ष २०२४-२५ मध्ये अविरत विना अपघात सुरळीत विज सेवा, रोहित्राची काळजी, अचानक उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्येचे निराकरण करणे, कामाच्या ठिकाणची देखभाल, इत्यादी क्षेत्रात कर्त्यव्य दक्षता, निष्ठा



व श्रम दाखवून उल्लेखनीय कार्य केले. या कामगिरीबद्दल कछोट यांच्या हस्ते अरुण जाधव यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले आहे. तंतज्ञ अरुण जाधव यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महसूल सहाय्यक कृष्णा फुलमाळी उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तहसील मधील महसूल सहाय्यक कृष्णा फ ुलमाळी उत्कृष्ट सेवा कार्य केल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत त्यांचा



सत्कार करण्यात आला आहे. हा सत्कार सन २०२४ २५ महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सत्कार करण्यात आला आहे. दरम्यानच्या काळात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांची निवड समितीमार्फत निवड करण्यात आली होती. त्यांनी केलेल्या कार्याची दखल निवड समितीने घेतली. उत्कृष्ट कार्य करत असताना सेवा देणे हा त्यांचा उद्देश होता. तहसील कार्यालयातील वरिष्ठ महसूल सहाय्यक म्हणून त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या या कार्याबद्दल आज सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल जाफराबाद तहसीलच्या तहसीलदार डॉक्टर सारिका भगत, सर्व नायब तहसीलदार, सर्व महसूल सहाय्यक, सर्व कर्मचारी, यांनी अभिनंदन केले आहे.

# लेखणी चालवा पण सत्याच्या बाजूने...

आजकाल बहुतांश लेखक, साहित्यिक व पत्रकार शासनाच्या दावणीला बांधले गेले आहेत. देशात व समाजात सध्या काय चित्र चालू आहे? व नेमकी सामाजिक वस्तुस्थिती काय आहे? याचे आजकालच्या काही लेखकांना व पत्रकारांना काहीही देणे घेणे राहिले नाही. जो राजकारणी आपल्याला दररोज चारा टाकतो, भरपूर पैसा देतो आणि वेळोवेळी पुरस्कार देऊन सन्मानित करतो अशाच राजकीय लोकांच्या बाजूने आजकालचे बहुतांश लेखक, साहित्यिक व पत्रकार आपली लेखणी चालवताना दिसतात. दररोज वर्तमानपत्रात राजकीय नेत्यांच्या बाजूने मीठ मिरचू लावून बातम्या छापतात. त्यात त्यांच्याच नावाची वाहवा करतात. कुत्र्यांसारखे त्यांच्या मागे पुढे फिरतात. आपण लिहिलेल्या पुस्तकात केवळ त्यांच्याच नावाचा जयजयकार करतात. शासन कितीही गलतान कारभार करत असले, शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यात सपशेल अपयशी ठरले, तरीही हे पत्रकार त्यांची खरी वस्तुस्थिती वर्तमानपत्रात न मांडता मूग गिळून गप्प बसतात. म्हणजे ते शासनाची खरी वस्तुस्थिती मांडायला घाबरतात की, काय? असेच म्हणावे लागेल. कारण त्यांना माहित असते की, ज्या दिवशी आपण शासनाच्या विरोधात लेखणी चालवाल त्यादिवशी आपला चारा पाणी बंद होईल. आणि आपल्याला पुरस्कार देखील मिळणार नाही. म्हणून आजकालचे बहुतांश लेखक व पत्रकार शासनाच्या विरोधात लेखणी चालवायला जरा घाबरत आहेत. मग असले स्वार्थी लेखक व पत्रकार काय कामाचे? यांना लेखक, साहित्यिक व पत्रकार म्हणावे तरी कसे? हा साहित्य व पत्रकारीता क्षेत्राला कलंक असून, लोकशाहीचा खरा अपमान आहे, असेच म्हणावे लागेल. राजकारणी लोकांच्या अधीन राहून लेखणी चालवणे म्हणजे लेखकांनी व पत्रकारांनी लाचारी पत्करणे होय.असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मग असे स्वाभिमान शून्य जीवन काय कामाचे? काही काही लेखक मंडळी तर राजकीय लोकांवर पुस्तके लिहितात. आणि त्यांच्या कमी कार्याचा जास्त आव आणून पुस्तक प्रकाशित करतात. आणि पुस्तक प्रकाशनाला राजकीय नेत्यांनाच आमंत्रित करून त्यांच्याच हाताने पुस्तकाचे प्रकाशन करतात. म्हणजे आजकाल पुस्तक प्रकाशनाला राजकीय लोकांना बोलावणे व त्यांच्या नावाचा त्यात उल्लेख करणे हे साहित्यिकांचे प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे.

खरे तर गोरगरीब, उपेक्षित, वंचित तसेच शेतकरी,शेतमजूर व काम गार लोकांच्या व्यथा व त्यांच्या समस्या वर्तमानपत्रात व पुस्तकात निर्भीडपणे मांडणे हे लेखकांचे व पत्रकारांचे कर्तव्य असते. त्यांची सामाजिक बांधिलकी असते. पण आजकालची लेखक मंडळी आपले कर्तव्य व सामाजिक बांधिलकी विसरून केवळ स्वार्थापायी राजकीय लोकांच्या बाजूने लेखणी चालवत असताना दिसत आहे. काही काही वार्ताहर तर टीव्हीवर न्यूज देताना केवळ शासनाच्याच बाजूने बोलताना दिसतात. शासनाने कोणते कार्य केले आणि कोणते नाही? याचा कसलाच विचार न करता, शासन देशासाठी खूप चांगले काम करत आहे. सर्वसामान्य लोकांसाठी विकासाच्या विविध योजना राबवत आहे. देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम करत आहे. देशातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्राला सक्षम करू पाहत आहे. अशा खोट्या आशयाच्या बातम्या सरकारच्या बाजूने मीठ मिरचू लावून मांडण्यात आजकालचे पत्रकार व वार्ताहर स्वार्थापायी आघाडीवर आहेत. तेव्हा लोकशाहीत दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा घोर अपमान होत आहे, याचे केवळ स्वार्थासाठी आजकालच्या पत्रकारांना व लेखकांना भान राहिले नाही. हेच लोकशाही लिहिणाऱ्या घटनाकार डॉ.बाबासाहेबांना कदापि मान्य नव्हते.

मान्य आहे की शासनाच्या विरोधात लिहिणाऱ्या व बोलणाऱ्या पत्रकारांना व लेखकांना संपवले जात आहे. त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली जात आहे. हे खरेही असेल कदाचित पण स्वाभिमान गहाण ठेवून जगण्यापेक्षा, स्वाभिमानाने म रण पत्करणे हे कधीही चांगले आहे. म्हणून आपल्या पेशाशी व कार्याशी एकनिष्ठ राहून समाज कार्य करणे व स्वाभिमानाने देशासाठी बलिदान देणे हे खरे धाडसाचे काम आहे.

आपल्या देशात अनेक पत्रकार व लेखक होऊन गेले. त्यांनी निर्भीडपणे लोकांच्या व्यथा व समस्या लिखाणाच्या माध्यमातून जगाच्या वेशीवर टांगल्या, शासनाची वस्तुस्थिती निर्भीडपणे लोकांसमोर म ांडली, शासन कुठे कमी पडत आहे व शासनाने नेमक्या काय चुका केल्या हे लोकांना दाखवून दिले. म्हणजे खरे लिहायला व बोलायला तत्कालीन लेखक, साहित्यिक व पत्रकार कधीच घाबरले नाहीत. निस्वार्थपणे आपल्या पेशाशी एकनिष्ठ राहून त्यांनी आपले काम करतच राहिले. अशा काही महान लेखकांचा व साहित्यिकांचा मला उल्लेख करावा वाटतो.

महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे व डॉ.नरेंद्र दाभोलकर व इत्यादी काही महान लेखकांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत लोकांच्या व्यथा आणि व्यथेच्या कथा लिखाणाच्या माध्यमातून जगाच्या वेशीवर टांगल्या, शासनाचे खरे पितळ उघडे पाडले आणि शासन व्यवस्था हादरवून सोडली पण स्वार्थापाई कधीच शासनापुढे झुकले नाहीत. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी शेवटपर्यंत निर्भीडपणे अंधश्रद्धा निम ूलन करण्याचे काम केले. आपल्या झुंजार लेखणीच्या माध्यमातून शासनाला जागृत केले. पण काही समाजकंटकांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. पण त्यांची ही हत्या म्हणता येणार नाही. त्यांनी देशासाठी बलिदान दिले. असेच म्हणावे लागेल. म्हणून या महान लेखकांच्या चरणी माझा साष्टांग दंडवत!

माझे गुरुवर्य बबनराव गुळवे गुरुजी हे सुद्धा आपली लेखणी सत्याच्याच बाजूने निर्भीडपणे चालवतात. वेळोवेळी लिखाणाच्या माध्यमातून शासनाच्या चुका, शासनाला दाखवून देतात. त्यांना कोणत्या पुरस्काराची हाव नाही की, कोणत्या पदाची. ते प्रमाणिकपणे आपला शिक्षकी पेशा करत करत सामाजिक कार्य करण्याचे प्रमाणिक काम करतात. म्हणून त्यांच्याही कार्याला मला सलाम करावा वाटतो...

आणि आजकालच्या काही लाचार व स्वाभिमान शून्य लेखकांना व पत्रकारांना मी सांगू शकतो की, बाबांनो कुठवर शासनाच्या दावणीला बांधून राहणार आहात.

कुठवर शासनाच्या बाजूने खोटी लेखणी चालवणार आहात...

घ्या ना जरा आपल्या म हापुरुषांचा आदर्श... चालवा ना शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या व काम गारांच्या बाजूने लेखणी...

पाडा ना सरकारचे खरे पितळ उघडे... देशाला दाखवून द्या ना सरकारची खरी वस्तुस्थिती...

तरच साहित्य व पत्रकारिता क्षेत्राला येतील सन्मानाचे दिवस... नाहीतर आपल्या दोन-चार पत्रकार व लेखकांमुळे साहित्य व पत्रकारिता क्षेत्राला कलंक लागल्याशिवाय राहणार नाही...

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी ता.अहमदपूर**
**जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## डाक विभागाच्या ज्ञान पोस्ट सेवेला १ मे पासुन सुरुवात

**जालना -** भारतीय डाक विभागातर्फे नवीन ज्ञान पोस्ट ह्या सेवेची सुरुवात दिनांक १ मे पासून करण्यात आलेली आहे. ह्या सेवे अंतर्गत ज्ञान प्रसाराचे लेखी दस्तावेज, पुस्तके, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक साहित्य (लेखन) माफक दारात डाक सेवेच्या माध्यमातून पाठवणे शक्य होणार आहे.

ज्ञान पोस्ट या नवीन मेल उत्पादनाची ओळख आढावा आणि उद्देश - ज्ञान पोस्ट हे टपाल विभागाच्या मेल सेवांतर्गत एक नवीन उत्पादन असेल, ज्याद्वारे प्रेषक विशिष्ट पुस्तके आणि अध्ययन साहित्य टपाल कार्यालयाद्वारे पाठवू शकेल.

वैशिष्ट्ये -ज्ञान पोस्ट या नवीन उत्पादनाची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेतः ऑनलाईन ट्रैकिंग सेवेद्वारे वस्तूचे ट्रॅक व ट्रेस करणे. पत्त्यानुसार विशिष्ट सेवा. पोस्टिंगचा पुरावा (पोस्टिंग पावती) प्रेषकास दिला जाईल. वितरणावेळी स्वाक्षरीनिशी मि ळण्याचा पुरावा (विनंतीनुसार). या वर्गाअंतर्गत नोंदवलेले पार्सल्स भूपृष्ठ मार्गे (ीीषरलश ेवश) पाठवले जातील.ज्ञान पोस्ट अंतर्गत पार्सल बुकिंगसाठी किमान वजन ३०० ग्रॅम आणि कमाल वजन ५ किलो असेल. हे उत्पादन टपाल कार्यालयाच्या काउंटरवर किरकोळ बुकिंगसाठी उपलब्ध असेल.

प्रेषकासाठी इतर महत्त्वाच्या सुविधा - पोस्ट केलेल्या टपाल वस्तूचा प्रेषक जेथे प्रेषक असा उल्लेख आहे तेथे प्रेषक म्हणून विचार करण्यात यावा. पुढील अटींच्या अधीन राहून ती वस्तू पोस्टमधून मागे घेऊ शकतो किंवा तिचा पत्ता बदलू शकतो. जर ती वस्तू अद्याप प्राप्तकर्त्याच्या वितरणासाठी इनव्हॉईस केलेली नसेल. जर ती वस्तू देशातील कोणत्याही कायद्याअंतर्गत जप्त करण्यात आलेली नसेल. प्रेषक अतिरिक्त शुल्क भरून वस्तू परत मागवू शकतो, जर ती वस्तू अद्याप वितरण कार्यालयात वितरणासाठी इनव्हॉईस केलेली नसेल. तरी सर्वांनी ज्ञान पोस्ट ह्या सुविधेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन मोहम्मद खदीर, अधिक्षक, परभणी विभाग यांनी केले आहे.

## कर्जमाफीच्या मुद्द्यावर बच्चू कडू आक्रमक

**मुंबई -** कर्जमाफीच्या मुद्द्यावर प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतलाय. कडू यांनी पुढच्या महिन्यापासून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. बच्चू कडू यांनी 'डीसीएम टू सीएम' अशा आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनांतर्गत बच्चू कडू २ जूनला बारामतीत अजित पवारांच्या घरासमोर 'अर्थसंकल्प वाचन आंदोलन' करून कर्जमाफीची आठवण करुन देणार आहेत.

पान १ वरुन

### आता फक्त ...

भोवताल कवितेत ठळकपणे मांडले असे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविकात विनोदकुमार पांडे यांनी प्रशिक्षणा दरम्यान डॉ.

संजीवनी तडेगावकर यांच्या मार्गदर्शना मुळेच आपल्याला प्रेरणा मिळाली असे स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला ग्राम स्थांचे बहुमोल सहकार्य लाभले असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ जालनाच्या वतीने शाळेत बसवण्यात आलेल्या फरशा ,गट्टूंचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी वेणू कान्हेरे, कमल क्षीरसागर यांच्या सह विद्यार्थ्यांनी कवितांचे सादरीकरण केले. मुख्याध्यापक विष्णू सोनटक्के यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक श्रीकांत अगमे,शिवहरी मेहेत्रे ,प्रकाश बंड ,शिवाजी तिडके, दत्ता वड्डे, विठ्ठल कान्हेरे, काकासाहेब खरात, लोखंडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक ,पालक ,आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### परतूरच्या दृष्टि ...

पुरुषोत्तम जयपुरीया, संजीव गुप्ता, राजेश लुणिया, अतुल लड्ढा, श्याम लोया, विजय दाड, धर्मेंद्र कुमावत, मुरारीलाल गुप्ता, अरुण मित्तल, जयश्री लड्ढा, मंजू श्रीमाली, प्रमोद टेकाळे, श्री. शेपाळ, श्री. भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

डायलिसिस सेंटर या उपक्रमासाठी अनेक दात्यांनी उदारहस्ते योगदान दिले आहे. ड. अर्चना तोतला आणि सीए नितीन तोतला यांनी स्व. ओंकारदास तोतला यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ६ लाख ७२ हजार, शकुंतलाताई भोसले व लायन प्रा. मधुकर भोसले (परतूर) यांनी प्रत्येकी १ लाख ११ हजार, सुनीता बोराडे, संजीवनी खालापुरे, सविता ठाकर व शोभा टकले यांनीही प्रत्येकी १ लाख ११ हजार रुपये, पुणे येथील श्रीमती विजया सोमाणी यांनी १ लाख रुपयांची देणगी दिली. आरोग्य केंद्राच्या सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी डॉ. बाउंड यांनी वातानुकूलित यंत्रणा, जालिंदर अवचार यांनी आरओ सिस्टीम आणि शालिनी पिंपळे यांनी दोन ॲडजस्टेबल पलंगांची देणगी दिली आहे.

याप्रसंगी उपक्रमासाठी योगदान देणाऱ्या सर्व दात्यांचे दृष्टी फाउंडेशन व लायन्स परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. हे केंद्र लायन्स क्लब परतूर आणि लायन्स क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमात केवळ डायलिसिस सेंटरचेच नव्हे तर नवीन स्वर्ग रथ, कॅन्सर बाह्यरुग्ण तपासणी कक्ष, लॉयन्स रुग्णवाहिकेचेही लोकार्पण करण्यात आले. यावेळी दृष्टी लायन्स नेत्रालयाचे अध्यक्ष मनोहर खालापुरे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. केवळ दीड वर्षांच्या कालावधीत ५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया व ६० हजार नेत्रतपासणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### ३६ तासात ...

महिन्यात महत्त्वाचे ग्रह बदलले आहेत, जे भारताला हे ग्रहमान उच्च स्थानी आहेत. तर पाकिस्तानचे ग्रहमान प्रतिकूल आहेत. या मे महिन्यात जगभरात खूप मोठा उत्पात होणार आहे. भारताला मोठा विजय मिळणार आहे. पाकिस्तानची खूप वाईट अवस्था होणार आहे. पाकिस्तानचे ग्रहमान अनुकूल नाही. हा मे महिना खूप महत्वाचा असून यामुळं जागतिक महायुद्ध घडू शकेल असे मत अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांनी व्यक्त केले आहे.

सध्या जगासमोर मोठं आव्हान आहे. पाकिस्तान हे दहशतवाद्याचं आश्रयस्थान आहे. त्या पाकिस्तानातून जगभरात दहशतवादी पसरले आहेत. गेल्या आठवड्यात पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला, त्यानंतर आपला देश खडबडून जागा झाल्याची माहिती भगरे गुरुजींनी दिली आहे. एकदा पाकिस्तानची खोड मोडली पाहिजे अशी सर्वसामान्य लोकांची भावना आहे. ग्रहमानानुसार तीन ग्रह बदलत आहेत. गुरु, राहु आणि केतू यामध्ये बदल होत आहेत. त्यामुळंफार मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. म्हणजे दोन्ही देशामध्ये युद्ध होण्याची शक्यता आहे. यामध्ये हानी होण्याची शक्यता आहे. आपल्या देशासाठी ग्रहमान चांगले आहे. आता जरी युद्ध सुरु केले तर भारताचा विजय निश्चित असल्याचे भगरे गुरुजी म्हणाले.

भारत आणि पाकिस्तानकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. आपल्या बाजून जसे देश आहेत, तसेच पाकिस्तानच्या बाजूनेही काही देश आहेत. पण सध्या पाकिस्तानची वाईट अवस्था आहेत. त्यामुळं पाकिस्तानला युद्ध परवडणारे नाही. त्यांच्या आणि आपल्या राशीत खूप अंतर आहे. त्यांना ग्रहंमान प्रतिकूल असल्याचे भगरे गुरुजी म्हणाले. त्यामुळं पुढच्या ३६ तासात या दोन्ही देशात युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता असल्याचे भगरे गुरुजी म्हणाले.

### लाडकी बहिण ...

मिळणार? याची माहिती त्यांनी सांगितली आहे. 'लाभार्थी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये एप्रिल महिन्याचा हप्ता आजपासून (२ मे) जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे', असं आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया आजपासून (२ मे) सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल. या म ाध्यमातून महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठीचा सरकारचा संकल्प अधिक दृढ केला जात आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत दिली आहे.

### तहानलेल्या गावांसाठी ...

अधिकाऱ्यांचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले. घाटगे पाटील आणि शेतकऱ्यांनी स्वतः कॅनॉलचे दरवाजे उघडले आणि अडवलेलं पाणी अखेर गोदावरीच्या दिशेने मार्गस्थ झालं. या निर्णायक क्षणी शेतकऱ्यांनी एकच जल्लोष केला आणि घाटगे पाटलांच्या हिमतीला सलाम केला. या आंदोलनात भाजपा तालुका प्रमुख शिवाजी मोरे, आसेफ कुरेशी, दत्ता लोने यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**अधिकाऱ्यांची झाली बोलती बंद!**

कॅनॉलचे दरवाजे उघडले जात असताना, धावतपळत आलेल्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतीश घाटगे पाटील यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शेतकऱ्यांची व्यथा आणि प्रशासनाची निगरगट्ठ भूमिका त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडली, ज्यामुळे अधिकाऱ्यांची बोलती बंद झाली. संतप्त शेतकऱ्यांनीही अधिकाऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला. धरणात पाणी असूनही जर आम च्या शेतकऱ्यांच्या जनावरांना प्यायला पाणी मिळत नसेल, तर या कॅनॉलच्या पाण्याचा काय उपयोग? अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकरी आणि गावकरी पाण्यासाठी तडफडत आहेत. म्हणूनच आम्हाला हे पाऊल उचलावे लागले, असे खडे बोल घाटगे पाटील यांनी सुनावले.

# जवखेडा येथील शेतकरी महिलेला तात्काळ नुकसान भरपाई द्या

## शिवसेनेचे महावितरणच्या उपअभियंत्यांना निवेदन

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील मौजे जवखेडा ठोंबरे येथील गट नंबर २५१ मधील असलेल्या विद्युत पुरवठ्याच्या शॉर्टसर्किटमुळे शेतकरी महिला मुक्ताबाई सकलादी ढवळे यांच्या जमीनीतील मक्काची गंज्जी, पुंज, शाळु चारा, मक्का चारा इत्यादी वस्तुचे झालेले नुकसानीचा तात्काळ पंचनामा करण्यात येवुन नुकसान भरपाई देण्यात यावी, आदी मागण्याचे निवेदन भोकरदन महावितरणच्या उपअभियंत्याला शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी दिले आहे.

उपतालुकाप्रमुख ठोंबरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे जवखेडा ठोंबरे शिवारातील गट नंबर २५१ मध्ये मुक्ताबाई सकलादी ढवळे यांच्या मालकीची व ताब्यातील शेतजमीन क्षेत्र. ०.हे.४० आर मध्ये त्यांची सालाबादाप्रमाणे कुटुबांच्या उदरनिर्वाह करण्यासाठी व मुलांच्या भवितव्यासाठी खरीप हंगाम मध्ये मक्का पिकाची लागवड केली व गट नंबर २३४ मधील शाळु चारा गट नबर २५१ मध्ये त्यांनी आणुन ठेवला होता. मक्काची गंज्जी,पुंज व मक्काचे पिक असे ज्यांची अंदाजे किमंत दहा हजार रुपये असे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी महिलेचा सहानुभुतीपुर्वक विचार करण्यात यावा. आपल्या कार्यालयाकडुन त्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा तात्काळ करण्यात येवुन त्या संबधीत गरीब



हा ३० एप्रिल रोजी दुपारी शॉटसर्किट होवून त्यांच्या शेतातील पिकाचे व चार्याचे न भरुन येणारे १ लाख ३० हजार रुपये व केबल,शेती उपयोगी पीव्हीसी पाईप, विहीरीतील मोटार पाईप शेतकरी महिलेस नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणीही उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी उपअभियंता महावितरण भोकरदन यांच्याकडे केली आहे.

# पटाया येथील भव्य विश्वशांती रॅलीत जालन्यातील सेवाभावींचा सहभाग



**जालना । प्रतिनिधी -** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने दि. १ मे रोजी थायलंडमधील पटाया (थायलंड) येथे काढण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय शांती रॅलीत जगभरातून विविध देशांतील सेवाभावी सहभागी झाले. जालना येथून चार सेवाभावींनी सहभाग नोंदविला. जगात शांती, सद्भाव आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश पसरवणे हे या दिव्य शांती रॅलीचे उद्दिष्ट होते.

या शांती रॅलीत भारताच्या विविध भागांतून ५०० तर महाराष्ट्रातून २५ सेवाभावी सहभागी झाले होते. बुऱ्हानपूर झोनमधून मंगला दीदी, कल्याण झोनमधून अलका दीदी यांनी रॅलीचे नेतृत्व केले. अकोला येथील रुक्मिणी दीदी, जालना शहरातून माजी नगराध्यक्ष सौ. कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना सौ. आशा मानधना, मध्यप्रदेशातील इंदौर येथून सुभाष माळी व मनोज गर्ग यांनी सहभाग नोंदविला. या रॅलीतील सहभागी सेवाभावींचे पटाया येथील मीरा दीदी व त्यांच्या सेवाभावी परिवाराने अत्यंत आत्मीयतेने स्वागत केले. पटाया येथील समुद्रकिनाऱ्यावर इव्हिनिंग वॉकसाठी देश-विदेशातील लाखो पर्यटक येतात. त्या अनुषंगाने या बीचवर शांती रॅली काढण्यात येऊन जागतिक शांततेचा संदेश देण्यात आला. विविध आध्यात्मिक सत्रे, ध्यानधारणा, सांस्कृतिक कार्यक्रम व जागतिक शांततेबाबतच्या चर्चांमधून ही रॅली अत्यंत प्रेरणादायी ठरली. सहभागी सेवाभावींच्या अनुभवाने, भक्तिभावाने व सेवेच्या निष्ठेने या रॅलीला एक आध्यात्मिक उंची प्राप्त झाली, असे सुनील लाहोटी यांनी सांगितले. या रॅलीच्या माध्यमातून मिळालेला शांतीचा संदेश सर्व सेवाभावी त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात पोहोचवतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

# एमएचटी-सीईटी २०२५ पीसीएम ग्रुपची ५ मे रोजी फेर परिक्षा

**जालना । प्रतिनिधी -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता राज्य सामाईक प्रवेश कक्षामार्फत घेण्यात आलेली एमएचटी-सीईटी २०२५ सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक ९ ते २७ एप्रिल, २०२५ या कालावधीत पार पाडली आहे. सदर परिक्षेदरम्यान दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात झालेल्या परिक्षेमध्ये उमेदवारांना गणित विषयाशी संबधीत तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे उमेदवारांनी सीईटी सेलकडे ई-मेल, पत्र, टिकीट सिस्टम, दुरध्वनी आणि प्रत्यक्ष सीईटीकक्षास भेट देवुन पालक/उमेदवारांनी आक्षेप/तक्रारी नोंदविल्या आहेत. उमेदवार/पालक यांच्या तक्रारीची दखल घेवून तसेच उमेदवारांच्या शैक्षणिक हित लक्षात घेता सीईटीसेल कडून पुढील निर्णय घेण्यात आला आहे.

दि. २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. त्याप्रमाणे दि. २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात परीक्षा दिलेली आहे, अशा परिक्षेकरिता उपस्थित सर्व उमेदवारांची फेरपरिक्षा दि. ५ मे, २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. याची संबंधीत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी. सदर परिक्षेस उपस्थित राहीलेल्या उमेदवारांची यादी सीईटीसेलच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. या यादीमध्ये नाव असलेल्या उमेदवारांनी फेरपरिक्षा देणे अनिवार्य आहे. सदर फेर परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांना त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी अधिकृत माहितीसाठी राज्य सीईटीकक्षाच्या संकेतस्थळ www.mahacet.org वर नियमीतपणे भेट द्यावी. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.